# महाराष्ट्र शासन

## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

## जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे आस्थापनेवरील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहिरात.

**जाहिरात क्रमांक-२०१४/ब/कक्ष.१/आस्था/कावि/ १७५ दिनांक १५ /०५ /२०१४**

नंदुरबार जिल्हयातील, जिल्हाधिकारी नंदुरबार यांचे आस्थापनेवरील व अधिनस्त शासकीय कार्यालयातील गट क संवर्गातील लिपीक-टंकलेखक, तलाठी, वाहनचालक व गट ड संवर्गा मधील शिपाई-वॉचमन मधील पदांसाठी रिक्त असलेली पदांवरील नियुक्तीसाठी व संभाव्य रिक्त पदांचे प्रतिक्षायादीसाठी एकत्रीत भरती साठी. त्यानुसार ईच्छुक व पात्र उमेदवारांकडून सदर जाहिरातीद्वारे **दि.३० /०५/२०१४** पावेतो **फक्त ऑनलाईन पध्दतीने** www.nandurbar.nic.in किंवा www.nandurbarexam.com या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

## कार्यालयाचे नाव :- जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार

पदनिहाय रिक्त पदे व संभाव्य रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे.

**१) पदाचे नाव :- लिपिक-टंकलेखक गट-क**

**भरावयाची एकुण पदे : - १७ वेतनश्रेणी- ५२००-२०२०० ग्रेड पे-१९००**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त व संभाव्य रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | | |
| अनु. जाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| विजा-अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इमाव | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | १३ | ४ | २ | १ | ० | ० | १ | ५ | १३ |
| एकूण | १७ | ५ | २ | १ | ० | ० | १ | ८ | १७ |

**२)पदाचे नाव :- तलाठी**

**भरावयाची एकुण रिक्त पदे :१५ - वेतनश्रेणी- ५२००-२०२०० ग्रेड पे-२४००**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त व संभाव्य रिक्तपद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | | |
| अनु.जमाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| अनु. जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विजा-अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भज-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भज-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इ.मा.व | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ११ | ३ | २ | १ | ० | ० | १ | ४ | ११ |
| **एकूण** | **१५** | ४ | २ | १ | ० | ० | १ | ७ | १५ |

**३)पदाचे नाव :- वाहनचालक**

**भरावयाची एकुण पदे : - ०३ वेतनश्रेणी- ५२००-२०२०० ग्रेड पे-१९००**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त व संभाव्य रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | | |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भज-क | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकुण | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

**४)पदाचे नाव :- शिपाई-वॉचमन**

**भरावयाची एकुण रिक्त व संभाव्य रिक्तपदे : - ४ वेतनश्रेणी- ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००**

| **अनुशेषाचा प्रवर्ग** | **रिक्त व संभाव्य रिक्त पद संख्या** | **महिला** | **माजी सैनिक** | **खेळाडू** | **प्रकल्पग्रस्त** | **भूकंपग्रस्त** | **अंशकालीन** | **समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | | |
| अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भज-क | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **३** | **३** |

**उमेदवाराची शैक्षणिक व इतर अर्हता**

**पद क्र.१- लिपिक-टंकलेखक-** एस.एस.सी. (माध्यमिक शालांत परीक्षा) उत्तीर्ण अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य जाहिर केलेली अर्हता असणे आवश्यक. (सदर अर्हता दिनांक १६/०५/२०१४ रोजी प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे)

**टंकलेखन अर्हता:-** शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र-टंकलेखन- मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी-४० श.प्र.मि. उत्तीर्ण (सदर अर्हता दिनांक १६/०५ /२०१४ रोजी प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे)

**संगणक अर्हता** : म.ना.से. (संगणक हाताळणी/वापरण्याबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत ) नियम १९९९ च्या नियम ३ अन्वये आवश्यक अर्हता म्हणून खालील अ किंवा ब प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून २ वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पुर्वसूचना न देता समाप्त करणेत येईल.

**अ)संगणक** ज्ञानाविषयी D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C.किंवा O किंवा A किंवा B किंवा C यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,

**ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ यांचेकडील अधिकृत एमएस-सीआयटी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र

**पद क्र.२- तलाठी- शैक्षणिक अर्हता** : संविधानिक विद्यापीठाची पदवी अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य जाहिर केलेली अर्हता असणे आवश्यक. (सदर अर्हता दिनांक १६ /५/२०१४ रोजी प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे)

**संगणक अर्हता** :- पद क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे

**पद क्र.३- वाहनचालक**

शैक्षणिक अर्हता : किमान इयत्ता ४ थी पास

मोटर वाहन अधि.१९८८ अन्वये जड वाहन अथवा मोटर कार, अथवा जीप चालवण्याचा परवाना असणे आवश्यक आहे तसेच मोटर वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक

**पद क्र.४- शिपाई-वॉचमन**

शैक्षणिक अर्हता : किमान इयत्ता ४ थी पास (सदर अर्हता दिनांक १६/०५ /२०१४ रोजी प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे)

**टिप :-**

१) सदर पदांमध्ये आंतरजिल्हा बदली/पदोन्नती व इतर कारणांमुळे कमी/ जास्त बदल होण्याचा संभव आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्ती बाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. याबद्दल उमेदवारांनी कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यांत येणार नाही. हे अधिकार जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी राखून ठेवले आहेत.

२) समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविणेत आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदापैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराव्दारे सदरचे पद भरले जाईल.

**पदांकरीता वयोमर्यादा :-**

१. उपरोक्त पदांकरीता **दिनांक- १६ /०५/२०१४** रोजीची वयोमर्यादा गणली जाईल.
२. उपरोक्त पदांकरीता **दिनांक- १६ /०५/२०१४** रोजीचे उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. मागासवर्गीय उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. परंतु उन्नत व प्रगत गटां मध्ये क्रिमीलेयर (Creamy Layer) मोडणाऱ्या विजा.अ., भज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., विमाप्र आणि इमाव प्रवर्गातील उमेदवारांना ही सवलत लागू नाही.
४. सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना वयोमर्यादा ४६ वर्षे इतकी असेल.
५. खेळाडू उमेदवारांकरीता वयोमर्यादेची अट कमाल वयोमर्यादा अधिक ५ वर्षांपर्यंत गुणवत्तेनुसार शिथील करणेत येईल.
६. माजी सैनिक :- माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहिल. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षे पर्यंत राहील.
७. अपंग उमेदवारांचे बाबतीत उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. अपंग प्रवर्गातील उमेदवाराचे किमान अपंगत्वाचे प्रमाणे ४० टक्के असल्याबाबतचा स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करू शकेल, असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे. तसेच अपंग उमेदवारास लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकांचे परीक्षेचे शुल्क रु.१००/- ही चलनाद्वारे परीक्षा शुल्कामध्ये वाढ करुन त्याप्रमाणे भरावी लागेल व ती नापरतावा राहिल. ज्या उमेदवारांनी लेखनिकची मागणी केली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
८. स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील
९. प्रकल्पग्रस्त /भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

**१०. परीक्षा शुल्क :-**

खुला **प्रवर्ग** - रु.३००/- **मागास प्रवर्ग** - रु.१५०/-

उक्त परीक्षा शुल्क **स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या** कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे. माजी सैनिकांना परीक्षा शुल्क माफ आहे.

**टिप :-** वरील शुल्क हे जिल्हा निवड समितीसाठी आहे. याशिवाय शुल्क जिल्हा निवड समितीच्या नावाने जमा करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाकडून रु. ६०/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**विशेष सूचना :-**

१. अतिरिक्त संवर्ग, आंतर विभागीय समायोजन, आंतर जिल्हा/विभागीय बदली, पदोन्नती व तसेच इतर कारणांमुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी/ जास्त होणे ) आरक्षण /समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२. नियुक्ती देणेचे नियमात, पदसंख्येत / आरक्षणांत बदल करणे, रद्द करणेचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी नंदुरबार यांना राहतील.
३. शासनाने भरती बाबत / नियुक्ती बाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके ,आदेश इ. लागू राहतील.
४. महिला / माजी सैनिक / अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षण विरहीत म्हणून भरली जातील.
५. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रीया पूर्ण होई पावेतो सुधारित शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.
६. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती नंदुरबार यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

## अर्ज करण्याची पध्दत :-

१. प्रस्तुत पदांकरीता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
२. पात्र उमेदवाराला **वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज** **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या वेबसाईटव्दारे **दि. १६ /०५/२०१४ ते दि.३०/५/२०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.
३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत फी भरण्याचे चलन ०३ प्रतीमध्ये उपलब्ध होईल. (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढून परिक्षा शुल्क रोखीने त्या चलनामार्फतच चलानवर दिलेल्या सूचनेतील तारखेनंतर परंतू **दिनांक ३१ /०५ /२०१४** पर्यंत भरणे आवश्यक राहील. उमेदवाराने फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या तीन प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया, बँकेकडून परत मिळेल त्यापैकी जिल्हा निवड समितीची प्रत, अशा उमेदवाराने कागदपत्रांच्या छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करावी. **सदर चलनाची *मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी केली जाणार नाही .***
४. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा चालू ई-मेल आयडी व स्वत:चा अदयावत (Latest) फोटो असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदवणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक आहे तसेच स्वत:चा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनुसार विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करताना फोटोची साईज ४० KB पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराकडे फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र परीक्षेच्या दिवशी आणणे आवश्यक आहे.
५. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेलआयडी व मोबाईल क्र.चुकीचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्र.NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणाऱ्या सुचना,संदेश माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहिल. तांत्रिक अडचणींना अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी नंदुरबार हे जबाबदार राहणार नाही.
६. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाच्या बाबींचा तपशील **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
७. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे.

कोणत्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही. प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.

## पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती :-

१) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतू ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे.ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत / दिशाभूल माहिती भरलेचे निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवारावर फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

**२) अंतिम निवड**

अ) लिपिक-टंकलेखक व तलाठी पदासाठी उमेदवाराची अंतिम निवड हि लेखी परीक्षेत मिळालेल्या एकुण गुणांच्या आधारे तसेच वाहनचालक पदासाठी लेखी,व्यावसायिक चाचणी व तोंडी परीक्षेत मिळालेल्या एकुण गुणांच्या आधारे तसेच शिपाई-वॉचमन पदासाठी लेखी व तोंडी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे निवड केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण मिळाल्यास** खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

२) मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी-१९९० पूर्वीच्या तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाणे; त्यानंतर २८

३) शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले उमेदवार त्यानंतर

४) माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर

५) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार

६) वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

३) लेखी परीक्षेअंती उमेदवाराचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांचे आधारे मुळ कागदपत्र पडताळणी करण्याकरीता अंतरिम स्वरुपात यादी जाहिर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क, मुळ कागदपत्रांचे आधारे परिपुर्ण सिध्द होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता,ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्र तपासणीचे वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवारांचे मागितलेले सामाजिक/समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण परीक्षा शुल्क इ.सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

४) विभागीय व भाषा परीक्षा- विहित शासकिय नियमानुसार विभागीय परीक्षा व भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे

५) उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. नियुक्तीपूर्वी, मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला, तसेच आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकित प्रमाणपत्रे (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्टमास्तर / प्राचार्य व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे) इ. ची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल. लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे प्राथमिक निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्र तपासणीसाठी

www.nandurbar.nic.in **किंवा www.nandurbarexam.com** या संकेतस्थळावर दिनांक जाहिर करण्यात येईल त्या दिवशी व संबंधित उमेवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे आवश्यक कागदपत्रांसह हजर रहाणे आवश्यक राहिल.

६) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडेस असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय दि. २७ जून २०११ नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

७) गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमेदवारांना मुळ कागदपत्रांची तपासणी करणेकरीता बोलाविण्यात येईल. उमेदवारांना कागदपत्रे तपासणीच्या वेळी मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

८) उक्त पदांसाठी छाननी न करता जाहिरातीनुसार परिपुर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा सांकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इत्यादी तपशील **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

९) लेखी परीक्षेसाठी व कागदपत्रांच्या छाननीसाठी उमेदवारास स्वखर्चाने यावे लागेल.

१०) जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, नंदुरबार या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे **रितसर ऑनलाईन अर्ज** करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११) विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

१२) अंतिम निवड यादीमध्ये निवड झालेले उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसाचे आत रूजू होणे आवश्यक राहील.

१३) शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६६०ब दिनांक १२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१४) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमूक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून आमंलात आणला आहे. त्यानूसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजाअ, भजब, भजक, भजड, विमाप्र व इमाव यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे ३१ मार्च २०१४ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलीअरचे तत्व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

१५) उक्त नमूद पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबातचे (नॉन क्रिमिलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे पत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक १/७/२००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन विवाहित/अविवाहित उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक१९ मार्च २००३ नुसार गट क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत शासनाने ठरवून दिलेली संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील.

१७) शासन वित्त विभाग निर्णय क्रं अनियो /१०/०५/१२६/सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि. १ नोंव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४)आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१८) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दि.६/१०/२०१० अन्वये प्रकल्पग्रस्त /भुकंपग्रस्त/स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य,सन १९९१ चे जणगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी व पदवीधर, पदवीधर अंशकालीन कर्मचारी यासर्व घटकातील उमेदवारांना, जर त्यांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यास टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासुन ६ महिने इतका कालावधीची मुदत अनुज्ञेय राहिल.

१९) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२०) उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

२१) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली, म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे उमेदवारांनी समजू नये.

२२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना व भरतीची जाहिरात **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.comया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## समांतर आरक्षाणातंर्गत असलेल्या कोटयासाठी अटी व शर्ती:-

अ) **अंशकालीन उमेदवारासाठी :-**

अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजबार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहीजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही

**ब) माजी सैनिक उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित/साक्षांकित प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडून पडताळणी झाल्या शिवाय त्यांना नियुक्ती आदेश देणेत येणार नाही.

क) **महिलांसाठी असलेले आरक्षण** :-

महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का-२ दिनांक २५ मे २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी वर्ष २०१३ - २०१४ या कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात दि.३१/३/२०१४ पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमिलेयर) प्रमाणपत्र **तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.**

ड) **अत्युच्च्य गुणवत्ताधारण खेळाडू उमेदवारासाठी :-**

अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रंमाक रक्रिधो-२००२/प्रक्र ६८/क्रियूसे-२ दिनं ाक ३० एप्रिल २००५ मधील तरतूदीनुसार राहील. खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे. सदर खेळाडूने सेवा प्रवेशनियमातील तरतुदीनूसार पदासाठी आवश्यक आसलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी. गट क व ड साठी खेळांच्या

वैयक्तीक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अंजिक्य पद स्पर्धात प्रथम,द्वितीय,तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य,किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिंक्य पद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक ओसोशिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशने स्वत:आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या उमेंदवारास प्राधान्य देणेत येईल. वैयक्तीक रित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफीसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.(इ) खेळाडूंकडील प्रमाणपत्र संचालक,क्रिडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनूसार आहे किंवा नाही हे तपासून घेणेत येईल. खेळाडूंसाठी वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत अट शिथील राहील.

**परीक्षेचे स्वरुप :-**

- शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. प्रनि.म.२००७/प्रक्र४६/०७/१३/अ दिनांक १९/१०/२००७ मधील तरतुदीनुसार अन्वये लिपिक-टंकलेखक,तलाठी यापदांसाठी लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर निवड करण्यात येईल. तसेच वॉचमन-हमाल कम स्विपर यापदासाठी ७५ गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची मौखिक परीक्षा घेण्यात येऊन निवड करण्यात येईल. तसेच वाहनचालक पदासाठी लेखी परीक्षा, व्यावसायीक चाचणी व मुलाखत घेऊन अंतिम निवड करण्यात येईल.
- लेखी परिक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल. लिपिक-टंकलेखक व तलाठी पदासाठी २०० गुण असतील. लिपिक-टंकलेखक पदासाठी लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल मराठी,इंग्रजी, सामान्यज्ञान,अंकगणित या विषयावरील प्रश्नाकरीता २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. तसेच तलाठी पदाकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परीक्षेचा दर्जा मान्यताप्राप्त विदयापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहिल. लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी,अंकगणित या विषयावरील प्रश्नांकरीता २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
- तसेच वाहनचालक पदासाठी ५०% गुणांची लेखी परीक्षा ४०% गुणांची व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी १० गुण ठेवुन उमेदवाराची निवड करण्यात येईल. लेखी परीक्षेमधुन गुणानुक्रमे पात्र होणा-या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीचा तसेच मुलाखतीचा दिनांक **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या संकेतस्थळावर नंतर कळविला जाईल.
- लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
- वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
- लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेले गुण **www.nandurbar.nic.in** किंवा www.nandurbarexam.com या संकेस्थळावर पाहता येतील, या गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.
- परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २७ जून २००८ मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.
- वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेवून कागदपत्रांच्या पडताळणीसाठी पात्र करण्यात आलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार त्यांच्या कागदपत्रांच्या छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्रांच्या छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्यांचे निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही.

- निवड झालेले उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र एक महिन्याचे आत सादर करणे आवश्यक राहील

रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| लिपिक,वाहनचालक व शिपाई-वॉचमन पदासाठी | |
|---|---|
| भरती प्रकिया कार्यक्रम | संभावित दिनांक |
| अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दि. १६/५/२०१४ ते दि. ३०/५/२०१४ |
| बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दि. ३१ /५/२०१४ |
| लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दि. ४/६/२०१४ पासुन लेखी परीक्षेच्या दिनांका पर्यंत |
| लेखी परीक्षा | दि.८/६/२०१४ |

| तलाठी पदासाठी | | |
|---|---|---|
| अ.क्र | भरती प्रकिया कार्यक्रम | संभावित दिनांक |
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दि.१६/५/२०१४ ते दि. ३०/५/२०१४ |
| ०२ | बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दि. ३१/५/२०१४ |
| ३ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दि. १६/६/२०१४ पासुन लेखी परीक्षेच्या दिनांका पर्यंत |
| ४ | लेखी परीक्षा | दि. २२/६/२०१४ |

वाहनचालक पदासाठी व्यावसायिक चाचणी, मौखिक परीक्षा तसेच शिपाई-वॉचमन पदासाठी मौखिक परीक्षेचा दिनांक सदर वेबसाईटवर नंतर कळविण्यात येईल.

**विशेष सूचना:-**

- या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करायाची आवश्यकता नाही, तरीहीज्या उमेदवारं ाकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.
- अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी ८७९३०८३७१२/१३/१४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**दिनांक :- १५ /०५/२०१४**
**स्थळ :- नंदुरबार**

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, नंदुरबार

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी नंदुरबार